RNI No. MAHBIL /2009/35527

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-क

वर्ष १२, अंक ३३]	गुरुवार, जुलै ३०, २०२६/श्रावण ८, शके १९४८	[पृष्ठे ९, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ५३**

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाव्यतिरिक्त इतर वैधानिक प्राधिकाऱ्यांनी तयार केलेले (भाग एक, एक-अ व एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले वैधानिक नियम व आदेश यांव्यतिरिक्त इतर) वैधानिक नियम व आदेश; यात भारत सरकार, उच्च न्यायालय, पोलीस आयुक्त, आयुक्त (राज्य उत्पादन शुल्क), जिल्हादंडाधिकारी व निवडणूक आयोग, निवडणूक न्यायाधिकरण, निवडणूक निर्णय अधिकारी व निवडणूक आयोगाखालील इतर प्राधिकारी यांनी तयार केलेले वैधानिक नियम व आदेश यांचा समावेश होतो.**

### आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य

सर्वेक्षण क्र. ३४१, वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१, दिनांक ३०/०७/२०२६.

**आदेश**

**विषय.**—अन्न सुरक्षा व मानके अधिनियम, २००६ च्या कलम ३०(२)(अ) अन्वये, सार्वजनिक आरोग्याच्या हितासाठी, संपूर्ण महाराष्ट्र राज्यामध्ये पनीर या नावाने विक्री केल्या जाणाऱ्या अनुरूप / दुग्धेतर पनीर (अर्थात दुग्ध संदर्भातील अनुरूप) याचे उत्पादन, साठवण, वितरण (वाहतुकीसह) व विक्री यांवर एक वर्षाच्या कालावधीसाठी मनाई; तसेच विनियम २.१.१६ अन्वये पनीर / छेना यांची मानके, आवेष्टन व लेबल लावणे यांबाबत निर्देश.

क्रमांक सीओएमएम/फूड/आदेश/पनीर/९८६ -२०२६/७.—ज्याअर्थी, भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१ अन्वये हमी दिलेला जीवनाचा अधिकार हा सुरक्षित व सकस अन्नाच्या उपलब्धतेचा अविभाज्य भाग आहे; आणि संविधानाच्या अनुच्छेद ४७ नुसार लोकांच्या पोषणाच्या स्तरात वाढ करणे, जीवनमान उंचावणे व सार्वजनिक आरोग्य सुधारणे हे राज्याचे प्रथम कर्तव्य आहे; आणि भारताच्या माननीय सर्वोच्च न्यायालयाने असे प्रतिपादन केले आहे की, संविधानाच्या अनुच्छेद २१ व अनुच्छेद ४७ यांचा संयुक्त विचार करता मानवी जीवन व आरोग्याचे योग्य संरक्षण सुनिश्चित करणे हे राज्य व त्याच्या प्राधिकरणांवर असलेले सर्वोच्च व मूलभूत कर्तव्य आहे;

आणि ज्याअर्थी, अन्न सुरक्षा व मानके अधिनियम, २००६ (यात यापुढे ज्याचा निर्देश, “अधिनियम” असा केला आहे) याच्या कलम १८(१) मध्ये अधिनियमाच्या प्रशासनासाठी अनुसरावयाची सर्वसाधारण तत्त्वे निर्धारित करण्यात आली असून त्यामध्ये —

(अ) मानवी जीवन व आरोग्याचे योग्य स्तरावर संरक्षण करणे तसेच सर्व प्रकारच्या अन्न व्यापारामध्ये न्याय्य व्यवहारांसह ग्राहकांच्या हितांचे संरक्षण सुनिश्चित करणे;

(ब) जोखीम मूल्यांकनाच्या निष्कर्षांचा विचार करून जोखीम व्यवस्थापन करणे;

(क) उपलब्ध माहितीच्या मूल्यांकनावरून आरोग्यावर अपायकारक परिणाम होण्याची शक्यता निदर्शनास येत असली तरी वैज्ञानिक अनिश्चितता कायम असल्यास खबरदारीच्या तत्त्वानुसार तात्पुरती जोखीम-व्यवस्थापन उपाययोजना करण्याची परवानगी असेल; आणि

(ड) अशा उपाययोजना प्रमाणबद्ध असाव्यात व आरोग्य संरक्षणासाठी आवश्यक त्या मर्यादेपेक्षा व्यापारावर अधिक निर्बंध आणणाऱ्या नसाव्यात;

आणि ज्याअर्थी, अधिनियमाच्या कलम ३०(२)(अ) नुसार, सार्वजनिक आरोग्याच्या हितासाठी व लेखी कारणे नोंदवून, अन्न सुरक्षा आयुक्तांना **राजपत्रात** अधिसूचना प्रसिद्ध करून, एखादा अन्नपदार्थ असुरक्षित अथवा आरोग्यास अपायकारक असण्याची वाजवी कारणे असल्यास, संपूर्ण राज्यात किंवा त्याच्या कोणत्याही भागात, अशा अन्नपदार्थाचे उत्पादन, साठवण, वितरण किंवा विक्री, यांस जास्तीत जास्त एक वर्षाच्या कालावधीसाठी मनाई करण्याचा अधिकार प्रदान करण्यात आलेला आहे;

आणि ज्याअर्थी, स्वामी अच्युतानंद तीर्थ ॲन्ड ऑदर्स (Swami Achyutanand Tirth & Others) विरुद्ध युनियन ऑफ इंडिया ॲन्ड ऑदर्स (Union of India & Others) रिट याचिका (नागरी) क्र. १५९/२०१२, निर्णय दिनांक ०५ ऑगस्ट २०१६ [(२०१६) ९ एससीसी ६९९], या प्रकरणामध्ये भारताच्या माननीय सर्वोच्च न्यायालयाने दूध व दुग्धजन्य पदार्थांमधील मोठ्या प्रमाणावरील भेसळ — ज्यामध्ये दुधातील स्निग्धांशाच्या ऐवजी शुद्ध/वनस्पती तेलाचा वापर समाविष्ट आहे — याची गंभीर दखल घेत, केंद्र सरकार व सर्व राज्य शासनांना अन्न सुरक्षा व मानके अधिनियम, २००६ ची अधिक प्रभावी अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले; तसेच विशेषतः राज्य अन्न सुरक्षा प्राधिकरणांनी उच्च जोखीम असलेले क्षेत्र व उच्च जोखीम असलेले कालखंड (उदा. सणासुदीचे दिवस) निश्चित करून तेथे नमुना संकलनाची तीव्रता वाढवावी, एनएबीएल (NABL) मान्यताप्राप्त प्रयोगशाळा व फिरती अन्न परीक्षण सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय समित्या स्थापन करून भेसळ प्रतिबंधक कार्याचा नियमित आढावा घ्यावा (जसे महाराष्ट्र राज्यात करण्यात येते), तसेच अधिनियमाच्या कलम १८(१)(फ) नुसार जनतेस आरोग्यावरील जोखमीबाबत माहिती द्यावी, असे निर्देश दिले असून, सदर निर्देशांमुळे या प्राधिकरणावर दूध व दुग्धजन्य पदार्थांतील भेसळ रोखण्यासाठी प्रभावी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याचे सातत्यपूर्ण दायित्व आलेले आहे;

आणि ज्याअर्थी, अन्न सुरक्षा व मानके अधिनियम, २००६ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या केंद्रीय सल्लागार समितीने, दिनांक १४ ऑक्टोबर, २०२५ रोजी झालेल्या आपल्या ४८ व्या बैठकीमध्ये "दुग्ध संदर्भातील अनुरूप" या विषयावरील तरतुदींवर विचारविनिमय करताना असे नोंदविले की, दुग्ध संदर्भातील अनुरूप उत्पादनांसाठी कोणतेही गुणवत्ता मापदंड निर्धारित करण्यात आलेले नाहीत; अशा मानकांच्या अभावामुळे अनुरूप पनीरविरुद्ध क्षेत्रीय स्तरावर प्रभावी अंमलबजावणी करणे अत्यंत कठीण होते; असे उत्पादन प्रत्यक्षात त्याच्या मूळ दुग्ध समकक्षाच्या तुलनेत निकृष्ट स्वरूपाचे असून ते जाणीवपूर्वक भेसळ वाढविण्यास कारणीभूत ठरते; पॅकेजबंद स्वरूपात विक्री झाल्यानंतरही ते उघडून सैल स्वरूपात विकले जात असल्यामुळे अंमलबजावणी करणे व्यवहार्य राहत नाही; विशेषतः पनीर हा प्रथिनांचा महत्त्वपूर्ण स्त्रोत मानणाऱ्या शाकाहारी ग्राहकांना अशा उत्पादनातून कोणताही पोषणात्मक लाभ मिळत नाही; तसेच विद्यमान जनजागृतीच्या पातळीचा विचार करता ग्राहकांवर अनुरूप व अस्सल पनीर यांपैकी निवड करण्याची जबाबदारी सोपविणे उचित ठरणार नाही; आणि म्हणूनच सदर समितीने असे मत व्यक्त करून शिफारस केली की, मानकीकरण नसलेली व पोषणात्मकदृष्ट्या लाभदायक नसलेली दुग्ध अनुरूप उत्पादने, जसे की अनुरूप पनीर, यांना परवानगी देऊ नये; तसेच सर्व राज्यांच्या अन्न सुरक्षा आयुक्तांना या संदर्भात आपली सहमती व अभिप्राय सादर करण्यासाठी आमंत्रित करण्यात आले;

आणि ज्याअर्थी, दिनांक ०१ एप्रिल, २०२५ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत राज्यभरातून पनीर / दुग्ध अनुरूप उत्पादनांचे नमुने घेऊन अधिसूचित अन्न प्रयोगशाळांकडे विश्लेषणासाठी पाठविण्यात आले; त्यापैकी आजअखेर ३०८ नमुन्यांचे विश्लेषण पूर्ण झाले असून, त्यामधील १०९ नमुने — म्हणजे विश्लेषित नमुन्यांपैकी ३५.४ टक्के — विहित मानकांशी विसंगत असल्याचे निष्पन्न झाले; त्यामध्ये ७९ नमुने निकृष्ट तर ३० नमुने असुरक्षित असल्याचे अहवाल प्राप्त झाले; तसेच निष्कर्षित स्निग्धांशाच्या विश्लेषणात त्यातील लक्षणीय प्रमाणातील नमुन्यांमध्ये **ब्यूटिरो-रिफ्रॅक्टोमीटर वाचन तसेच आयोडीन मूल्य हे दुधातील स्निग्धांशासाठी विहित मर्यादेबाहेर** असल्याचे आढळून आले असून, त्यावरून दुधात नैसर्गिकरीत्या नसलेला वनस्पतीजन्य स्निग्धांश मिसळण्यात आलेला किंवा त्याद्वारे दुधातील स्निग्धांशाची जागा घेतल्याचे निदर्शनास आले आहे;

आणि ज्याअर्थी, अधिसूचित प्रयोगशाळांकडून प्राप्त झालेल्या अहवालांनुसार, अशा पनीरमध्ये दुधातून न मिळणारा अथवा दुधात नैसर्गिकरीत्या नसलेला बाह्य स्निग्धांश आढळून आलेला असून, त्यामुळे अधिनियमाच्या तरतुदींनुसार सदर अन्नपदार्थ असुरक्षित तसेच मिथ्याछापित ठरतो;

आणि ज्याअर्थी, अशा अनुरूप / दुग्धेतर पनीरचे उत्पादन व विक्री, तसेच त्यास अस्सल पनीर म्हणून किंवा त्याच्या स्वरूपात विक्री करणे, यामुळे अन्नाचे स्वरूप व वास्तविक घटक याबाबत ग्राहकांची दिशाभूल होते; तसेच दुग्ध अनुरूप उत्पादनांना लागू असलेल्या लेबलिंगच्या आवश्यकतांचे — विशेषतः विनियम २.१.१(५)(ब) अन्वये दुधाऐवजी वापरण्यात आलेल्या दुग्धेतर घटकांची व बदलण्यात आलेल्या दुग्ध घटकांची अनिवार्य घोषणा — तसेच अन्न सुरक्षा व मानके (विक्रीवरील प्रतिबंध व निर्बंध) विनियम, २०११ यांचे उल्लंघन होते;

आणि ज्याअर्थी, पनीरची कायदेशीर स्थिती आता निर्विवादपणे निश्चित झालेली असून, अन्न सुरक्षा व मानके (अन्न उत्पादन मानके व अन्न संयोजके) विनियम, २०११ मधील विनियम २.१.१६ अन्वये पनीर हे एक मानकीकृत (Standardised) अन्नपदार्थ आहे. सदर विनियमानुसार पनीर म्हणजे दूध (कोणत्याही प्रकारचे), आवश्यक असल्यास त्यामध्ये अतिरिक्त दुग्धघन मिसळून, अनुज्ञेय आम्लकारक — जसे की लॅक्टिक आम्ल, सिट्रिक आम्ल, मॅलिक आम्ल, व्हिनेगर, ग्लुकोनो डेल्टा लॅक्टोन किंवा आंबट व्हे — यांच्या साहाय्याने साकळवून व उष्णता देऊन तयार केलेले उत्पादन होय; दुधातील स्निग्धांश हा पनीरचा अत्यावश्यक घटक आहे आणि त्याऐवजी वनस्पती तेल, वनस्पती स्निग्धांश किंवा इतर कोणताही दुग्धेतर स्निग्धांश वापरण्यास परवानगी नाही; परिणामी, ज्या उत्पादनामध्ये दुधातील स्निग्धांश अथवा दुग्धघन पूर्णतः किंवा अंशतः दुग्धेतर घटकांनी बदलण्यात आलेले असतात, असे उत्पादन कायद्याच्या दृष्टीने "दुग्ध संदर्भातील अनुरूप" असून त्यास विनियम २.१.१(३)(फ) व २.१.१(५)(ब) लागू होतात; असे उत्पादन "पनीर" नाही आणि त्यास "पनीर" या नावाने नामनिर्देशित, विक्री किंवा सेवा देता येणार नाही; तसेच अशा उत्पादनाच्या नावाच्या अगदी जवळ, दुग्ध घटकांच्या जागी दुग्धेतर घटक वापरल्याची घोषणा — उदाहरणार्थ, "Contains Vegetable Fat" व "Contains no milk fat" — विनियम २.१.१(५)(ब) अन्वये विहित पद्धतीने करणे बंधनकारक आहे; आणि कोणतेही अनुरूप / दुग्धेतर उत्पादन जर पनीर म्हणून विकले, पुरविले किंवा सेवा देण्यात आले, तर ते मिथ्याछापित ठरते; तसेच ते अन्न-श्रेणीचे नसलेल्या घटकांपासून तयार केलेले असल्यास किंवा अन्य प्रकारे विहित मानकांशी विसंगत असल्यास, ते अधिनियमाच्या अर्थाने असुरक्षित देखील ठरते;

आणि ज्याअर्थी, अन्न सुरक्षा व मानके (अन्न उत्पादन मानके व अन्न संयोजके) विनियम, २०११ मधील विनियम २.१.१६ अंतर्गत छेना व पनीर यांच्यासाठीचे मानक, अन्न सुरक्षा व मानके (अन्न उत्पादन मानके व अन्न संयोजके) (पाचवी सुधारणा) विनियम, २०१९ द्वारे सुधारित करण्यात आले असून, त्यानुसार दुधातील स्निग्धांशाच्या प्रमाणावर आधारित पनीरचे तीन वर्ग — (१) पनीर (सामान्य / पूर्ण-स्निग्धांशयुक्त), (२) मध्यम स्निग्धांशयुक्त पनीर, आणि (३) कमी स्निग्धांशयुक्त पनीर — निर्धारित करण्यात आले आहेत, तसेच त्यांच्या संरचनात्मक मानकांसह आवेष्टन व लेबल लावणे या संबंधी आवश्यकताही खालील तक्त्यामध्ये नमूद केल्याप्रमाणे निर्धारित करण्यात आल्या आहेत; आणि सदर मानकांनुसार कमी स्निग्धांशयुक्त व मध्यम स्निग्धांशयुक्त पनीर / छेना यांची विक्री केवळ सीलबंद पॅकेजमध्येच करण्यात येईल व त्यावर विहित लेबल घोषणा असणे बंधनकारक राहील, तर सामान्य (पूर्ण-स्निग्धांशयुक्त) पनीर अधिनियम व विनियमांच्या अधीन राहून सैल स्वरूपात विक्री करता येईल; आणि सदर मानकांशी अनुरूप नसलेले कोणतेही उत्पादन — विशेषतः कोणतेही अनुरूप / दुग्धेतर पनीर — "पनीर" या नावाने नामनिर्देशित, विक्री अथवा सेवा करता येणार नाही;

**विनियम २.१.१६ अन्वये पनीर / छेना यांचे मानक, आवेष्टन व लेबल लावणे**

[अन्न सुरक्षा व मानके (अन्न उत्पादन मानके व अन्न संयोजके) विनियम, २०११ —
पाचवी सुधारणा विनियम, २०१९ द्वारे सुधारित]

| वर्ग | आर्द्रता (कमाल) | कोरड्या पदार्थावरील दुधातील स्निग्धांश | विक्री / पॅकेजिंग | नाव व लेबल |
|---|---|---|---|---|
| **पनीर / छेना (सामान्य / पूर्ण-स्निग्धांशयुक्त)** | छेना – ६५ टक्के / पनीर – ६० टक्के | ५० टक्के पेक्षा कमी नाही | सैल किंवा पॅकेजबंद | "पनीर" / "छेना"; पॅकेजबंद असल्यास सामान्य लेबल घोषणा |
| **मध्यम स्निग्धांशयुक्त पनीर / छेना** | छेना – ६५ टक्के / पनीर – ६० टक्के | २० टक्के पेक्षा अधिक परंतु ५० टक्के पेक्षा कमी | फक्त सीलबंद पॅकेजमध्ये | "मध्यम स्निग्धांशयुक्त पनीर / छेना" व विहित घोषणा |
| **कमी स्निग्धांशयुक्त पनीर / छेना** | छेना व पनीर – ७० टक्के | २० टक्के पेक्षा जास्त नसावा | फक्त सीलबंद पॅकेजमध्ये | "कमी स्निग्धांशयुक्त पनीर / छेना" व विहित घोषणा |

**आणि ज्याअर्थी,** पुढे असेही निदर्शनास आले आहे की, अनेक हॉटेल्स, रेस्टॉरंट्स, केटरर्स, भोजनालये तसेच इतर अन्न सेवा आस्थापना ग्राहकांना पुरविण्यात येणाऱ्या विविध खाद्यपदार्थांमध्ये अस्सल पनीरऐवजी अनुरूप / दुग्धेतर पनीरचा वापर करीत आहेत; तथापि, त्याबाबत मेनू कार्ड, चलन किंवा प्रदर्शन फलक यांवर कोणतीही माहिती अथवा घोषणा देत नाहीत; परिणामी, संबंधित खाद्यपदार्थांमध्ये अस्सल दुग्धजन्य पनीर वापरण्यात आले आहे, असा ग्राहकांचा समज होतो; यामुळे ग्राहकांची दिशाभूल होते, त्यांचा माहितीपूर्ण निवडीचा अधिकार हिरावला जातो आणि अशी कृती अधिनियम तसेच अन्न सुरक्षा व मानके (लेबलिंग व प्रदर्शन) विनियम, २०२० यांच्या तरतुदींचे उल्लंघन करणारी आहे;

**आणि ज्याअर्थी,** पुढे असेही आढळून आले आहे की, असे सैल पनीर अनेकदा मूळ आवेष्टनशिवाय, विहित लेबल घोषणांशिवाय, चलनांशिवाय, बॅच ओळख तपशिलांशिवाय किंवा पुरेशा शोधक्षमता दर्शविणाऱ्या कागदपत्रांशिवाय वाहतूक, साठवण व विक्री करण्यात येत आहे; त्यामुळे अशा उत्पादनाचा मूळ स्त्रोत प्रभावीपणे शोधणे अशक्य किंवा अत्यंत कठीण होते आणि त्यामुळे सार्वजनिक आरोग्यास गंभीर धोका निर्माण होतो;

**आणि ज्याअर्थी,** जवळपास एक वर्षाच्या कालावधीत सातत्याने अंमलबजावणी, संरक्षण, नमुना संकलन, जनजागृती आणि लेबलिंगविषयक उपाययोजना राबवूनही, विहित मानकांशी विसंगत पनीर अथवा अस्सल पनीरऐवजी वनस्पती स्निग्धांशयुक्त अनुरूप पनीर वापरण्याच्या घटनांमध्ये कोणतीही लक्षणीय घट झालेली नाही; विश्लेषित नमुन्यांपैकी ३५.४ टक्के नमुने आजही विहित मानकांशी विसंगत आढळत असून, केवळ नियमित नमुना संकलन व विद्यमान लेबलिंग व्यवस्था यांच्या माध्यमातून सार्वजनिक आरोग्याचे संरक्षण करणे व अशा प्रकारच्या गैरप्रकारांना प्रभावीपणे आळा घालणे पुरेसे ठरत नसल्याचे स्पष्टपणे सिद्ध झाले आहे;

**आणि ज्याअर्थी,** माझ्यासमोर सादर करण्यात आलेली सर्व सामग्री — ज्यामध्ये तपासणी अहवाल, जप्ती पंचनामे, प्रयोगशाळा निष्कर्ष, अन्न-श्रेणीचे नसलेल्या घटकांचा वापर, उत्पादन क्षेत्रात तसेच अन्न सेवा क्षेत्रामध्ये अस्सल पनीरऐवजी अनुरूप / दुग्धेतर पनीरचा पद्धतशीर वापर, अनुरूप पनीरसाठी विहित गुणवत्ता मानकांचा अभाव व त्यामुळे क्षेत्रीय स्तरावरील अंमलबजावणीतील अशक्यता, तसेच केंद्रीय सल्लागार समितीचे विचारपूर्वक नोंदविलेले मत— यांचा विचार केल्यानंतर माझी अशी खात्री पटली आहे की, अनुरूप / दुग्धेतर पनीर हा एक वर्ग म्हणून मानकीकृत नसलेला, पोषणात्मकदृष्ट्या लाभदायक नसलेला, इंद्रियगोचर गुणधर्मांच्या दृष्टीने अस्सल पनीरपासून वेगळा ओळखता न येणारा आणि जाणीवपूर्वक भेसळ करून अस्सल पनीर म्हणून विक्री करण्यास सहज प्रवृत्त करणारा असल्यामुळे, तो मानवी आरोग्यास तसेच ग्राहकांच्या हितास गंभीर धोका निर्माण करतो; तसेच हा आदेश केवळ अशा **मानकीकरण नसलेल्या दुग्ध अनुरूप** उत्पादनांपुरता मर्यादित आहे, ज्यांच्यासाठी अन्न प्राधिकरणाने कोणतेही गुणवत्ता निकष निर्धारित केलेले नाहीत; आणि हा आदेश Frozen Dessert, Processed Cheese, Mixed Fat Spread यांसारख्या विधिवत **मानकीकृत** उत्पादनांना लागू होणार नाही, कारण अशा उत्पादनांसाठी स्वतंत्र मानके विधिवत अधिसूचित करण्यात आलेली आहेत; केंद्रीय सल्लागार समितीनेही हाच भेद स्पष्टपणे मान्य केला आहे; त्यामुळे सार्वजनिक आरोग्याच्या हितासाठी, अधिनियमाच्या कलम ३०(२)(अ) अन्वये अधिकारांचा वापर करून, संपूर्ण महाराष्ट्र राज्यात अशा अन्नपदार्थांना एक वर्षापर्यंत मनाई करणे आवश्यक, न्याय्य व प्रमाणबद्ध असल्याचे मी समाधानपूर्वक निश्चित केले आहे.

**त्याअर्थी,** अन्न सुरक्षा व मानके अधिनियम, २००६ च्या कलम ३०(२)(अ) तसेच कलम १८ व २९ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा, तसेच याबाबत मला प्राप्त इतर सर्व सक्षम अधिकारांचा वापर करून, मी, **तुकाराम मुंढे, भा.प्र.से., अन्न सुरक्षा आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य,** याद्वारे हा आदेश निर्गमित करीत असून, हा आदेश महाराष्ट्र राज्यातील पनीर तसेच अनुरूप / दुग्धेतर पनीरचे उत्पादन, साठवण, वितरण (वाहतुकीसह) व विक्री करणाऱ्या सर्व खाद्य व्यवसाय चालकांवर पुढीलप्रमाणे बंधनकारक राहील :—

**१. व्याख्या**

या आदेशाच्या प्रयोजनार्थ, "**अनुरूप / दुग्धेतर पनीर**" म्हणजे असे कोणतेही पनीरसदृश उत्पादन ज्यामध्ये दुधातील स्निग्धांश अथवा दुग्धघन पूर्णतः किंवा अंशतः वनस्पती तेल, वनस्पती स्निग्धांश अथवा इतर दुग्धेतर घटकांनी बदलण्यात आलेले आहेत.

**२. अनुरूप / दुग्धेतर पनीरवर प्रतिबंध**

महाराष्ट्र राज्यामध्ये **अनुरूप / दुग्धेतर पनीर (कोणत्याही नावाने संबोधले अथवा वर्णन केले जाणारे)** याचे **उत्पादन, प्रक्रिया, तयारी, आवेष्टन (पॅकिंग), साठवण, वितरण (वाहतुकीसह), घाऊक विक्री, किरकोळ विक्री, विक्रीसाठी देऊ करणे अथवा प्रदर्शित करणे, तसेच कोणत्याही प्रकारे विक्री करणे** यांवर याद्वारे, सदर आदेश **राजपत्रात** प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून **एक वर्षाच्या कालावधीसाठी मनाई करण्यात येत आहे.**

**३. अन्न सेवा आस्थापना (हॉटेल्स, रेस्टॉरंट्स, केटरर्स इ.)**

कोणतेही हॉटेल, रेस्टॉरंट, केटरर, भोजनालय, क्लाउड किचन अथवा इतर अन्न सेवा आस्थापना कोणत्याही खाद्यपदार्थात, तयारीत अथवा अन्नपदार्थात अनुरूप / दुग्धेतर पनीरचा **वापर, तयारी, सेवा, साठवण, साठा, विक्री अथवा जतन** करणार नाही; आणि अनुरूप / दुग्धेतर पनीरचा वापर अथवा सेवा — अस्सल पनीर म्हणून केल्यास त्यासह — ग्राहकांची दिशाभूल करणारी असून **अधिनियमाच्या कलम २४ च्या अर्थांतर्गत अनुचित व्यापार प्रथा असून अधिनियमाच्या कलम २६ अन्वये अन्न व्यवसाय चालकांवर टाकलेल्या जबाबदाऱ्यांचे उल्लंघन** ठरत असल्याने त्यावर याद्वारे **मनाई करण्यात येत आहे.**

**४. पनीर — लेबलिंग अनुपालन**

पनीर / छेना यांचे उत्पादन, पॅकिंग, साठवण, वितरण अथवा विक्री करणाऱ्या प्रत्येक खाद्य व्यवसाय चालकाने प्रत्येक पॅकेजवर **अन्न सुरक्षा व मानके (लेबलिंग व प्रदर्शन) विनियम, २०२० अन्वये विहित सर्व घोषणा** नमूद असल्याची खात्री करावी, अन्यथा सदर अन्नपदार्थ **अधिनियमाच्या कलम ५२ च्या अर्थांतर्गत मिथ्याछापित** म्हणून कार्यवाहीस पात्र ठरेल.

**५. शास्ती व परिणाम**

या आदेशाच्या कोणत्याही उल्लंघनाबद्दल अन्न सुरक्षा व मानके अधिनियम, २००६ मधील लागू दंडात्मक तरतुदींनुसार — ज्यामध्ये कलम ५०, ५१, ५२, ५५ व ५९ यांचा समावेश आहे — कारवाई करण्यात येईल, तसेच संबंधित अन्नपदार्थ कायद्यानुसार जप्ती व नष्ट करण्यास पात्र ठरेल.

**६. प्रारंभ, कालावधी व निवेदने**

हा आदेश **राजपत्रात प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून** अंमलात येईल व त्या दिनांकापासून **एक वर्षाच्या** कालावधीसाठी अंमलात राहील, जोपर्यंत तो कायद्यानुसार त्यापूर्वी रद्द, सुधारित अथवा वाढविण्यात येत नाही.

सदर आदेश सार्वजनिक आरोग्याच्या संरक्षणासाठी तसेच महाराष्ट्र राज्यातील ग्राहकांना सुरक्षित अन्नाची उपलब्धता सुनिश्चित करण्याच्या हितासाठी निर्गमित करण्यात येत आहे.

**तुकाराम मुंढे** (भा.प्र.से.),
अन्न सुरक्षा आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

**COMMISSIONER, FOOD AND DRUG ADMINISTRATION, MAHARASHTRA STATE**

Survey No. 341, Bandra-Kurla Complex, Bandra (East),
Mumbai 400 051, Date 30th July 2026.

**Order**

**Subject.—**Prohibition, in the interest of public health, of the manufacture, storage, distribution (including transport) and sale of Analogue / Non-Dairy Paneer (Analogue in Dairy Context) which is marketed in the name of paneer, throughout the State of Maharashtra for a period of one year under Section 30(*2*)(*a*) of the Food Safety and Standards Act, 2006; and directions regarding the standards, packaging and labelling of Paneer / Chhana under Regulation 2.1.16.

No. COMM/FOOD/ORDER/PANEER/ 986-2026/7.—**WHEREAS,** the availability of safe and wholesome food is an integral facet of the right to life guaranteed under Article 21 of the Constitution of India, and Article 47 of the Constitution enjoins upon the State, as a primary duty, the raising of the level of nutrition and the standard of living of its people and the improvement of public health; and the Hon'ble Supreme Court of India has held that there is a paramount duty cast upon the State and its authorities to ensure an appropriate level of protection of human life and health, the same being a fundamental right under Article 21 read with Article 47 of the Constitution;

**AND WHEREAS,** Section 18(*1*) of the Food Safety and Standards Act, 2006 (hereinafter referred to as "the Act") sets out the general principles to be followed in the administration thereof, including —

*(a)* the achievement of an appropriate level of protection of human life and health and the protection of consumers' interests, including fair practices in all kinds of food trade;

*(b)* risk management taking into account the results of risk assessment;

*(c)* the precautionary principle, permitting provisional risk-management measures where, on an assessment of available information, the possibility of harmful effects on health is identified though scientific uncertainty may persist; and

*(d)* the requirement that such measures be proportionate and no more restrictive of trade than is required to achieve the appropriate level of health protection;

**AND WHEREAS,** Section 30(*2*)(*a*) of the Act empowers the Commissioner of Food Safety of the State, in the interest of public health and for reasons to be recorded in writing, by notification in the *Official Gazette*, to prohibit the manufacture, storage, distribution or sale of any article of food in the whole of the State or any area thereof for such period not exceeding one year as may be specified, where there exist reasonable grounds for believing that such article of food is likely to be unsafe or injurious to health;

**AND WHEREAS,** the Hon'ble Supreme Court of India, in Swami Achyutanand Tirth & Ors. *v.* Union of India & Ors., Writ Petition (Civil) No. 159 of 2012, decided on 5th August 2016 [(2016) 9 SCC 699], taking note of the large-scale adulteration of milk and milk products — including the use of refined / vegetable oil as a substitute for milk fat — directed the Union of India and the State Governments to implement the Food Safety and Standards Act, 2006 in a more effective manner, and in particular directed that the State Food Safety Authorities identify high-risk areas and high-risk times (such as festival seasons) and intensify sampling therein, that adequate NABL-accredited testing infrastructure and mobile food-testing facilities be ensured, that State-level and District-level committees be constituted to review the work of curbing adulteration (as is done in the State of Maharashtra), and that the general public be informed of the nature of the risk to health in terms of Section 18(*1*)(*f*) of the Act; and the said directions cast a continuing obligation upon this authority to take effective preventive measures against the adulteration of milk and milk products;

**AND WHEREAS,** the Central Advisory Committee constituted under the Food Safety and Standards Act, 2006, in its 48th meeting held on 14th October 2025, while deliberating upon the provisions relating to "Analogue in Dairy Context", recorded that no quality parameters stand defined for analogue in the dairy context, that in the absence of such standards analogue paneer is difficult

to enforce at field level and is essentially a sub-standard product of its dairy counterpart which only increases deliberate adulteration, that even when packed it is opened and sold in loose form rendering enforcement infeasible, that it provides no nutritional benefit particularly to vegetarians who depend on paneer as a source of protein, and that the choice between analogue and genuine paneer cannot be left to the discretion of the consumer given the prevailing level of awareness; and the said Committee accordingly opined and recommended that non-standardized and nutritionally non-beneficial dairy analogues such as analogue of paneer should not be permitted, and invited the Commissioners of States to concur and furnish inputs thereon;

**AND WHEREAS,** during the period 01st April 2025 to 31st March 2026, samples of paneer / dairy analogue drawn from across the State were sent for analysis to notified Food Laboratories, of which **308 samples** stood analysed as on date, and of the analysed samples **109 samples — being 35.4% of the analysed samples —** were reported to be non-conforming, namely 79 sub-standard and 30 unsafe; and on analysis of the extracted fat a significant proportion thereof showed a **Butyro-refractometer (BR) reading and an Iodine Value outside the limits prescribed for milk fat,** indicating the addition or substitution of vegetable (foreign) fat not naturally present in milk;

**AND WHEREAS,** reports received from notified laboratories indicate that such paneer contained non-milk fat or foreign fat not naturally present in milk and milk products, rendering the article of food unsafe and misbranded under the provisions of the Act;

**AND WHEREAS,** the manufacture and sale of such analogue / non-dairy paneer, and the sale thereof as, or in the guise of, genuine paneer, deceives the consumer as to the nature and substance of the food, and contravenes the labelling requirements applicable to dairy analogues — including the declarations prescribed under Regulation 2.1.1(5)(b) as to the non-milk constituents used and the milk constituents replaced — as also the Food Safety and Standards (Prohibition and Restrictions on Sales) Regulations, 2011;

**AND WHEREAS,** the legal position of paneer is well-settled: paneer is a standardised food under Regulation 2.1.16 of the Food Safety and Standards (Food Products Standards and Food Additives) Regulations, 2011, defined as the product obtained from milk (of any variant), with or without added milk solids, by precipitation with permitted acidulants (lactic acid, citric acid, malic acid, vinegar, glucono delta lactone or sour whey) and heating; milk fat is an essential constituent of paneer, and the substitution or addition of vegetable oil, vegetable fat or any non-milk fat is not permitted; and accordingly a product resembling paneer in which milk fat or milk solids are replaced wholly or partly by non-milk constituents is, in law, an "analogue in dairy context" governed by Regulations 2.1.1(3)(f) and 2.1.1(5)(b), which is not paneer and cannot be named, sold or served as "Paneer", dairy terms not being available to a product intended to substitute a milk product, and which is required to declare, in close proximity to the name of the product, the substitution of milk constituents by non-milk constituents — for example, "Contains Vegetable Fat" and "Contains no milk fat" — in the manner prescribed under Regulation 2.1.1(5)(b); and any analogue / non-dairy product offered, sold or served as paneer is misbranded, and where prepared from non-food-grade ingredients or otherwise non-conforming, is unsafe within the meaning of the Act;

**AND WHEREAS,** the Standard for Chhana and Paneer under Regulation 2.1.16, as amended by the Food Safety and Standards (Food Products Standards and Food Additives) Fifth Amendment Regulations, 2019, prescribes three categories of paneer according to milk-fat content — namely Paneer (regular / full-fat), Medium Fat Paneer and Low Fat Paneer — together with their compositional standards and packaging-and-labelling requirements, as set out in the Table below; and in terms of the said Standard, Low Fat and Medium Fat Paneer / Chhana shall be sold in sealed packages only and shall bear the prescribed label declarations, whereas regular (full-fat) Paneer may be sold loose subject to the Act and the Regulations; and no product not conforming to the said Standard — and in particular no analogue / non-dairy paneer — may be named, sold or served as "Paneer";

*STANDARDS, PACKAGING & LABELLING OF PANEER / CHHANA UNDER REGULATION 2.1.16*

[FSS (Food Products Standards and Food Additives) Regulations, 2011, as amended by the Fifth Amendment Regulations, 2019]

| Category | Moisture (max.) | Milk Fat (on dry-matter basis) | Sale / Packaging | Naming & Label |
|---|---|---|---|---|
| **Paneer / Chhana (regular / full-fat)** | 65% (Chhana) / 60% (Paneer) | Not less than 50% | May be sold loose or pre-packed | "Paneer" / "Chhana"; general label declarations if pre-packed |
| **Medium Fat Paneer / Chhana** | 65% (Chhana) / 60% (Paneer) | More than 20% and less than 50% | Sealed package ONLY | "Medium Fat Paneer / Chhana" + prescribed declaration |
| **Low Fat Paneer / Chhana** | 70% (Chhana and Paneer) | Not more than 20% | Sealed package ONLY | "Low Fat Paneer / Chhana" + prescribed declaration |

**AND WHEREAS,** it has further been observed that hotels, restaurants, caterers, eateries and other food service establishments are, in numerous instances, using analogue / non-dairy paneer in place of genuine paneer in dishes and preparations served to consumers, without disclosing the same on menu cards, invoices or display boards, thereby causing such preparations to be understood as containing genuine dairy paneer and misleading consumers and depriving them of an informed choice, in contravention of the Act and the Food Safety and Standards (Labelling and Display) Regulations, 2020;

**AND WHEREAS,** it has further been observed that such loose paneer is frequently transported, stored and sold without original packaging, mandatory label declarations, invoices, batch identification details or adequate traceability documents, thereby frustrating effective source identification and posing a significant risk to public health;

**AND WHEREAS,** notwithstanding sustained enforcement, surveillance and sampling carried out over a period of one year and the awareness and labelling measures already in force, the incidence of non-conforming paneer and of the substitution of genuine paneer by vegetable-fat analogue has shown no appreciable improvement, the proportion of non-conforming samples remaining persistently high at 35.4% of the samples analysed, thereby demonstrating that enforcement through routine sampling and the existing labelling framework has, by itself, proved insufficient to arrest the said practice and to protect public health;

**AND WHEREAS,** upon consideration of the material placed before me — including inspection reports, seizure proceedings, laboratory findings, the use of non-food-grade ingredients, the systematic substitution of genuine paneer by analogue / non-dairy paneer in manufacture and in the food-service sector, the absence of any prescribed quality standards for analogue paneer and the consequent infeasibility of field-level enforcement, and the considered opinion of the Central Advisory Committee — I am satisfied that analogue / non-dairy paneer, as a class, being non-standardized, nutritionally non-beneficial, organoleptically indistinguishable from genuine paneer and inherently prone to deliberate adulteration and to being passed off as genuine paneer, presents a risk to human health and to the interests of consumers; and that this Order is directed at **non-standardized dairy analogues,** for which no quality parameters stand prescribed by the Food Authority, and does not extend to **standardized products** such as frozen dessert, processed cheese and mixed fat spread, for which standards stand duly notified — the said distinction being that drawn by the Central Advisory Committee itself; and that, in the interest of public health, a prohibition of the said article of food throughout the State for a period not exceeding one year, in exercise of the powers under Section 30(2)(a) of the Act, is necessary and proportionate;

**NOW, THEREFORE,** in exercise of the powers conferred under Section 30(*2*)(*a*) read with Sections 18 and 29 of the Food Safety and Standards Act, 2006, and all other powers enabling me in this behalf, I, **Tukaram Mundhe, I.A.S., Food Safety Commissioner, Food and Drug Administration, Maharashtra State,** hereby issue this Order, which shall have immediate effect and be binding upon all Food Business Operators engaged in the manufacture, storage, distribution (including transport) and sale of paneer and analogue / non-dairy paneer throughout the State of Maharashtra, as follows:

**1. DEFINITIONS**

For the purpose of this Order, **"analogue/non-dairy paneer"** shall mean any product resembling paneer in which milk fat or milk solids are replaced wholly or partly by vegetable oil, vegetable fat or other non-milk-derived constituents.

**2. PROHIBITION OF ANALOGUE / NON-DAIRY PANEER**

The **manufacture, processing, preparation, packing, storage, distribution (including transportation), wholesale sale, retail sale, offering or exposing for sale, and sale by any means whatsoever,** within the State of Maharashtra, of **analogue / non-dairy paneer (by whatever name called or described),** is hereby **prohibited throughout the State of Maharashtra for a period of one year** from the date of publication of this Order in the *Official Gazette*.

**3. FOOD SERVICE ESTABLISHMENTS (HOTELS, RESTAURANTS, CATERERS)**

No hotel, restaurant, caterer, eatery, cloud kitchen or other food service establishment shall **use, prepare, serve, store, stock, sell or keep** analogue / non-dairy paneer in any dish, preparation or article of food whatsoever; and the use or service of analogue / non-dairy paneer, including in the guise of genuine paneer, being misleading to consumers and **an unfair trade practice within the meaning of Section 24 of the Act, and a contravention of the responsibilities cast upon Food Business Operators under Section 26 of the Act,** is hereby **prohibited.**

**4. PANEER — LABELLING COMPLIANCE**

Every Food Business Operator manufacturing, packing, storing, distributing or selling paneer/ chhana shall ensure that every package thereof bears **all the declarations prescribed under the Food Safety and Standards (Labelling and Display) Regulations, 2020,** failing which the article shall be liable to be dealt with as **misbranded under Section 52 of the Act.**

**5. PENALTIES AND CONSEQUENCES**

Any contravention of this Order shall be punishable under the applicable penal provisions of the Food Safety and Standards Act, 2006 — including Sections 50, 51, 52, 55 and 59 — and shall render the offending article liable to seizure and destruction in accordance with law.

**6. COMMENCEMENT, DURATION AND REPRESENTATIONS**

This Order shall come into force on the **date of its publication in the** *Official Gazette* and shall remain in force for a period of **one year** from that date, unless earlier rescinded, modified or extended in accordance with law.

This Order is issued in the interest of protecting public health and ensuring the availability of safe food to consumers of the State of Maharashtra.

TUKARAM MUNDHE (I.A.S.),
Food Safety Commissioner,
Maharashtra State, Mumbai.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR.